ISBN:978-81-980033-5-5

जनता एज्युकेशन सोसायटी, आजरा संचालित

# आजरा महाविद्यालय, आजरा

ता. आजरा, जि. कोल्हापूर

## अर्थशास्त्र विभाग

आणि

## शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन, कोल्हापूर (सुयेक)

## ३५ वे वार्षिक अधिवेशन

रविवार दि. ५ जानेवारी, २०२५

# शिवार्थ

## स्मरणिका-२०२५

अध्यक्ष

**प्रा.एम.जी.पाटील**

शिवार्थ संपादक

**प्रा.डॉ.जयवंत इंगळे**

स्थानिक संपादक

**डॉ.संजय चव्हाण**

ISBN:978-81-980033-5-5

# INDEX


| Sr. No. | Paper name / Editor Name | Page No. |
|---|---|---|
| | **कृषी प्रकिया उदयोगाचे अर्थशास्त्र** | |
| 1 | सिताफळ प्रक्रिया उद्योगातून अर्थाजन<br>डॉ.संदिप बाळासाहेब जाधव | 1-2 |
| 2 | दूध प्रक्रिया उद्योग संधी व आव्हाने<br>प्रा.विनायक यशवंत वनमोरे | 3-6 |
| 3 | जयसिंगपूर शहरातील मिरची कांडप व्यवसायाचे अर्थशास्त्र<br>डॉ. व्ही. बी. देवकर | 7-9 |
| 4 | कृषी प्रकिया उद्योगाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील योगदान<br>डॉ.सुजाता जितेंद्र पाटील/डा.संजय ओमासे | 10-12 |
| 5 | भारतातील बटाटा प्रक्रिया सद्यस्थिती : संधी आणि आव्हाने<br>कु.खराडे निकिता सुनिल | 13-17 |
| 6 | दुग्ध प्रक्रिया व्यवसाय आणि दुग्धजन्य पदार्थ निर्मिती उद्योग<br>डॉ.जी.एस.पट्टेबहादुर | 18-19 |
| 7 | कृषी पुरक उद्योग : शेलीपालन एक किफायदशीर व्यवसाय<br>डॉ. महेंद्रबापू जाधव | 20-221 |
| 8 | कृषी प्रक्रिया उद्योगाचे सण आणि उत्सवातील महत्व<br>डॉ.संपदा टिपकुर्ले | 23-24 |
| 9 | भारतातील ग्रामीण उद्योगापुढील समस्या आणि उपाययोजना<br>श्री.निलेशकुमार एन. गुरव | 25-26 |
| 10 | महाराष्ट्रातील कृषी प्रक्रिया उद्योग व ग्रामीण विकास<br>डॉ.पदमाकर बळीराम तटाळे | 27-29 |
| 11 | भुदरगड तालुक्यातील काजू प्रक्रिया उद्योग<br>प्रा. डॉ. अस्मिता मिलिंद प्रधान | 30-32 |
| 12 | ग्रामीण विकासातील कृषी प्रक्रिया उद्योगाची भूमिका<br>डॉ.ए. बी. मुळीक | 33-35 |
| 13 | भारतातील कृषी प्रक्रिया उद्योग क्षेत्रावर जागतिकीकरणाचा आर्थिक प्रभाव<br>डॉ. अजय दगडू काटे | 36-38 |
| 14 | भारतातील अन्नप्रकिया उद्योगाची आर्थिक विकासातील भूमिका<br>प्रा. डॉ. जे.एस. इंगळे | 39-45 |
| 15 | कृषी प्रक्रिया उद्योगाचे प्रकार<br>प्रा.डॉ. के. पी. वाघमारे | 46-48 |
| 16 | कृषी प्रक्रिया उद्योगांची शेती विकासातील भूमिका<br>प्रा.शहाजी तुकाराम काळेल | 49-51 |
| 17 | कृषी प्रक्रिया उद्योगात सहकारी संस्थांची भूमिका<br>प्रा .मनिषा रविंद्र हाके | 52-54 |
| 18 | कृषी प्रक्रिया उद्योगांतील तंत्रज्ञानाचे महत्व आणि ग्रामीण विकासातील त्याचा उपयोग<br>प्राध्यापक श्रीमती पार्वती पाटील / अमृत मनोहर चव्हाण | 54-59 |
| 19 | ग्रामीण विकासात प्रक्रिया उद्योगाचे योगदान, वास्तव आणि समस्या<br>प्रा.डॉ.विनोदकर व्ही.एस. | 60-62 |
| 20 | भारतातील अर्थव्यवस्थेतील कृषी प्रक्रिया उद्योगाचे महत्व यांचा एक अभ्यास<br>कु. विश्रांती जांबिवंत चव्हाण | 63-65 |

ISBN:978-81-980033-5-5

# कृषी प्रक्रिया उदयोगाचे सण आणि उत्सवातील महत्व

**डॉ.संपदा टिपकुर्ले**
M . phil. ,Ph.D , SET , NET.
सहा.प्राध्यापक
विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर(अधिकारप्रदत्त स्वायत्त)
Mo. 9420133387
stipkurlegmail.com

**प्रस्तावना–**

सण आणि उत्सवामध्ये कृषी प्रक्रिया उद्योगाना अनन्यसाधारण महत्व आहे.विशेषत: ज्या प्रदेशांमध्ये सण हे सांस्कृतिक, धार्मिक किंवा हंगामी कृषी पद्धतींशी जवळून जोडलेले असतात. असे सण साजरे करण्यासाठी आवश्यक असलेले अन्न, पेये, प्रक्रिया केलेले काजू, सुकामेवा आणि मिठाई अनेकदा सजावटीच्या बॉक्समध्ये किंवा कंटेनरमध्ये पॅक करणे आणि इतरही पदार्थांचे उत्पादन उत्पादित करण्याचे काम हे उद्योग करतात. अनेक सणांमध्ये विशिष्ट खाद्यपदार्थ असतात जे सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असतात आणि विशिष्ट प्रक्रिया केलेल्या घटकांची आवश्यकता असते.मकर संक्रांतपासून गणेश उत्सव ,दिवाळी, ईद, ख्रिसमस यांसारख्या सणांमध्ये लोक मिठाई, अन्य खाद्य पदार्थ आणि जेवण तयार करतात जे प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांवर अवलंबून असतात.

❊ साखर आणि मिठाई – लाडू, मिठाई किंवा केक यासारख्या मिठाईच्या उत्पादनासाठी साखर प्रक्रिया केली जाते, जे अनेक सांस्कृतिक उत्सवांमध्ये मुख्य असतात.

❊ बेकिंग आणि स्वयंपाकासाठी पीठ:– विविध प्रकारचे पीठ (गहू, तांदूळ किंवा चणे) कुकीज, केक, डंपलिंग्ज किंवा चवदार पदार्थ यांसारखे सणाचे स्वादिष्ट पदार्थ बनवण्यासाठी प्रक्रिया केली जाते.

❊ मसाले:– अनेक सणामध्ये मसाले आवश्यक असतात कृषी प्रक्रियेमुळे मसाले बारीक(ग्राइंड) केले जाऊ शकतात, पॅकेज केले जाऊ शकतात आणि पुढील वापरासाठी संरक्षित केले जाऊ शकतात. हे प्रक्रिया केलेले पदार्थ आणि घटक सणाच्या पदार्थांची गुणवत्ता आणि परंपरा टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक आहेत.विविध सण आणि उत्सवाच्या विविध संस्कृति आणि परंपरा आहेत. ज्यामुळे कृषी प्रक्रिया उद्योगाला चालना मिळते.

महाराष्ट्राच्या नैऋत्य भागात असलेले कोल्हापूर हे समृद्ध सांस्कृतिक वारसा, पारंपारिक उत्सव आणि धार्मिक महत्त्व यासाठी ओळखले जाते. ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले हे शहर संपूर्ण वर्षभर अनेक सण साजरे करीत असते संपत्ती आणि समृद्धीची देवी महालक्ष्मी देवीला समर्पित महालक्ष्मी मंदिरासाठी कोल्हापूर प्रसिद्ध आहे. येथे दसरा हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्याचबरोबर दिवाळी, गणेशचतुर्थी, होळी, मकर संक्रांत हे सण ही मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. अशा विविध सण उत्सवासाठी विविध खाद्य परंपरा आणि संस्कृती असल्याने कृषी प्रक्रिया उद्योग व व्यवसायाना कोल्हापुरात मोठी संधि आहे.

**❊ गृहीतक –**

सण व उत्सवामध्ये कृषी प्रक्रिया उद्योग महत्वाचे आहेत.

**❊ उद्दिष्टे–**

१) कृषी प्रक्रिया उदयोग संकल्पना समजून घेणे.
२) सण व उत्सवातील कृषी प्रक्रिया उद्योगाचे महत्व अभ्यासणे.
३) कृषी प्रक्रिया उद्योगाचे दिवाळी मधील कोल्हापुरातील अर्थव्यवस्थेवरील परिणाम अभ्यासणे.

**❊ संशोधन पद्धती –**

सदर शोध निबंध हा कोल्हापूर शहरापूरता मर्यादित आहे. संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम माहिति स्त्रोत वापरले आहेत. सदरशोध निबंधामध्ये योग्यत्या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केला आहे.

कृषी प्रक्रिया उद्योग देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात, विशेषत: ज्या प्रदेशामध्ये शेती हेच उपजीविकेच प्रमुख साधन आहे.तेथे कच्च्या स्वरूपात असलेल्या कृषी उत्पादनांचे बाजार मूल्य कमी असते. प्रक्रिया उद्योगाद्वारे जसे की फिलिंग, कॅनिंग, पॅकेजिंग या मुळे या उत्पादनांचे मूल्य मोठ्या प्रमाणात वाढते.ज्यामुळे शेतकरी आणि उत्पादकांना त्यांच्या कच्च्या मालासाठी अधिक किंमत मिळू शकते.

सणांच्या काळात, स्थानिक कृषी प्रक्रिया उद्योगांना मागणी वाढत आहे. अनेक स्थानिक प्रक्रिया उद्योग आणि लहान–मोठे अन्न उत्पादक, मिठाया, फराळ लोणचे, जाम आणि चटण्या यांसारखी पारंपारिक उत्पादने तयार करतात, जे सणांच्या वेळी अनेकदा वापरले जातात किंवा भेट म्हणून दिले जातात. हे उद्योग स्थानिक अर्थव्यवस्थेत लक्षणीय योगदान देतात, रोजगार निर्माण करू शकतात. ग्रामीण आणि प्रादेशिक भागात उत्पन्नाचा प्रवाह वाढवू शकतात. याचा प्रत्यय यावर्षी कोल्हापूरमध्ये दिवाळीच्या काळात आला. कृषी प्रक्रिया उद्योगातील मिठाई व फराळाच्या निर्मिती व्यवसायामुळे कोल्हापूरच्या अर्थव्यवस्थेत मोठी उलाढाल दिसून आली.

ISBN:978-81-980033-5-5

**⁂ विविध वस्तूंच्या मागणी व किंमती वरीलपरिणाम –**

बाजारातून रेडिमड फराळ विकत घेणा–यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरातील अनेक महिला बचतगटांतर्फे दिवाळीचा फराळ तयार केला जातो. त्यांच्या या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. पेट्रोल, डिझेल व गॅसच्या किमतीत वाढ झाल्याने यंदा फराळाच्या वस्तूंच्या किमतीमध्येही वाढ झाली होती विविध फरळांचे दर प्रती किलो २५० ते ५०० रुपये असे होते.

**⁂ रोजगारावारील परिणाम –**

बचतगटांमार्फत तयार केलेल्या फराळाच्या कागणीत वाढ झाल्याने शहरातील मिठाईवाले व हॉटेल व्यावसायिकांना त्यांच्याशी स्पर्धा करावी लागत आहे. कोल्हापूरात अडीच हजार बचत गटातील महिलांना या काळात रोजगार मिळाला. १३०० पेक्षा जास्त स्टॉल्सवरुन यावर्षी फराळाची विक्री झाली आहे. फराळासाठी आवश्यक असणारे विविध साहित्य साखर, तेल फैदा, डाळी, विविध प्रकारची पिठे, इ.मुळे प्रक्रिया उद्योगाला चालना मिळत असून दिवसेंदिवस हे उद्योग व व्यवसाय विकसित होत राहतील.

**⁂ बाजारपेठेवरील परिणाम –**

घरगुती फ राळ तयार करण्याचे प्रमाण हे ६० टक्के कमी झाले आहे. शहरी भागात महिला वर्गाला कमी वेळ मिळत असल्याने तयार फराळाची मागणी वाढली आहे. बहुतेक बचत गटांनी तयार केलल्या मालाला स्थाीनिक बाजारपेठेबरोबरच परदेशातूनही मागणी येत आहे. असे फराळ विमानाने पाठवण्याबत आले. तेथील डॉलर प्रमाणे बचत गटांना पैसे मिळाले. यंदाच्या दिवाळीत जिल्ह्यात फराळातून १० ते १५ कोटी रूपयांची उलाढाल झाल्याचे दिसून आले. स्थलांतर आणि जागतिकीकरण जसजसे वाढत गेले आहे तसतसे पारंपरिक सणांच्या पदार्थांची आणि घटकांची मागणीही वाढत आहे. जागतिक स्तरावर सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण उत्पादने उपलब्ध करून देऊन कृषी प्रक्रिया उद्योगाने आपलेमहत्व अधोरेखित केले आहे.

**⁂ निष्कर्ष –**

सण आणि उत्सवांसाठी आवश्यक असलेल्या अन्न, विविध प्रकारच्या मिठाया,फराळ, प्रक्रिया केलेला सुकामेवा यांचा सातत्याने, परवडणारा आणि व्यापक पुरवठा उपलब्ध करून देवून सण साजरे करण्यासाठी कृषी प्रक्रिया उद्योग आवश्यक आहेत. स्थानिक अर्थव्यवस्थेमध्ये, रोजगार निर्माण करणे, कृषी उत्पादनाचा टिकाऊपणा वाढवणे, बाजारपेठा विस्तारीत करणे इत्यादिमुळे कृषी प्रक्रिया उद्योग सणांच्या यशात आणि आनंदात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांची उपलब्धता सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवण्यास, आणि लोकांना एकत्र आणण्यास मदत करतात, ज्यामुळे हे उद्योग सणासुदीच्या काळात अपरिहार्य बनत आहेत.

**⁂ उपाय योजना–**

१) बदलत्या जीवन शैलीमुळे कृषी प्रक्रिया उद्योग महत्वपूर्ण ठरत असून यामधील भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे.

२) वाढत्या मागणीचा विचार करता या उद्योगांमध्ये आधुनिक यंत्र सामग्रीचा वापर वाढविला पाहिजे.

३) जागतिक बाजारपेठ अधिक विस्तारीत करण्याकरिता निर्यात प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे.

**⁂ संदर्भ –**

अन्न प्रक्रिया उद्योग फळे आणि भाज्या प्रक्रिया डॉ. ललित विजय बोरा. सकाळ प्रकाशन पुणे १९९५

फळ प्रक्रिया उद्योग: FRUIT PROCESSING INDUSTRY दीपक आहीरे kindle edition 2022

‘Fermentation Effects on Food Property' Bhavbhutimehta Robert Iwanski e book 2012

'Food Additives Data Book'– Jim Smith Lily hong-shum 2003

***Websites –** https:// www.mofpi.gov.in/

https://www.foodprocessingindia.gov.in/sectors/fruits-vegetables

https://nim.udyamimitra.in/

---------------------------00000---------------------------